# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०१३

## घोषणा

राज्यसेवा पूर्व परीक्षा- २०१३ करीता अमरावती, नागपूर व पुणे या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांच्या अर्जांची नोंदणी अधिक संख्येने झाल्याने व प्रथमत: आयोजित तारखेस, म्हणजे दिनांक ७ एप्रिल, २०१३ रोजी इतर परीक्षाही असल्याने, उपरोक्त ३ जिल्हा केंद्रांवर काही उमेदवारांची बैठक व्यवस्था करणे शक्य झाले नव्हते. पुर्नआयोजित परीक्षेच्या दिवशी, म्हणजेच दिनांक १८ मे, २०१३ रोजी गोपनीय लेखनसामग्री अगोदरच पाठविली गेली असल्याने, सर्वसाधारणपणे पूर्वीचीच परीक्षा केंद्रे निश्‍चित केलेली आहेत. तरी उपरोक्त जिल्हा केंद्रांवरील काही उमेदवारांची बैठक व्यवस्था नजीकच्या जिल्हा केंद्रांवर करण्यात आली आहे, याबाबत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी. अशा त-हेची सूचना प्रवेश प्रमाणपत्राच्या मागेही अखेरीस टीप म्हणून नमूद करण्यात आली आहे.

**२**. अमरावती जिल्ह्यातील काही उमेदवारांची अकोला, वाशिम, यवतमाळ व वर्धा जिल्हाकेंद्रांवर ; नागपूर जिल्हातील काही उमेदवारांची वर्धा जिल्हा केंद्रावर व पुणे जिल्हातील काही उमेदवारांची रायगड जिल्ह्यात बैठक व्यवस्था करण्यात आली आहे, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : ७** मे, **२०१३** **सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**